आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

३१ जुलै २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केरळमधे वायनाड जिल्ह्यात काल दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या दोनशेच्या वर / १९१ लोक बेपत्ता
- यंदाच्या अर्थसंकल्पात प्राधान्याच्या बाबींमध्ये समतोल साधला असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं राज्यसभेत प्रतिपादन
- वादग्रस्त परिविक्षाधीन सनदी अधिकारी पूजा खेडकर यांची नियुक्ती केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून रद्द /यापुढं कोणतीही प्रशासकीय सेवा परीक्षा देण्यावरही बंदी
- महाराष्ट्राचे नवे राज्यपाल म्हणून सी. पी. राधाकृष्णन, तर राजस्थानचे राज्यपाल म्हणून हरिभाऊ बागडे यांचा शपथविधी

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंची आगेकूच सुरु

**<><><><><>**

केरळमधे वायनाड जिल्ह्यात काल दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या दोनशेच्या वर गेली आहे, तर १९१ लोक बेपत्ता आहेत. बचावकार्य आजही सुरू आहे. मुंडक्काई परिसरात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली असून अनेक मृतदेह मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले आहेत. काही मृतदेह चलियार नदीतून वाहत येत असून ते बाहेर काढण्यात येत आहेत. जखमी झालेल्या १८६ जणांवर विविध रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

चुरालमाला इथं तात्पुरता पूल उभारण्याचे लष्कराचे प्रयत्न,  सातत्यानं पडत असलेला जोरदार पाऊस आणि नदीच्या जोरदार प्रवाहामुळे दुपारी निष्फळ ठरले. संध्याकाळी पाऊस कमी झाल्यानंतर हे काम पुन्हा सुरु झालं.

केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान आणि गोव्याचे राज्यपाल पी. एस. श्रीधरन यांनी आज दुर्घटनाग्रस्त भागाला भेट देऊन पाहणी केली. केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन यांनीही आज घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली तसंच रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली.

<><><><><>

वायनाड दुर्घटनेविषयी आज राज्यसभेत चर्चा झाली. नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना केरळ सरकारला देऊनही त्यांनी प्रतिबंधात्मक उपाय केले नसल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या चर्चेत बोलताना सांगितलं. केरळमध्ये जोरदार पाऊस आणि दरड कोसळण्याची शक्यता असल्याचं केरळ सरकारला २३, २४ आणि २५ जुलै रोजी कळवलं होतं, लोकांच्या जीवाला धोका उत्पन्न होऊ शकतो, हेही सांगण्यात आलं होतं, मात्र केरळ सरकारनं लोकांना स्थलांतरित केलं नाही, असं शहा म्हणाले. गुजरात आणि ओदिशासारख्या राज्यांनी केंद्र सरकारनं दिलेला इशारा गांभिर्यानं घेतल्यानं तिथलं नुकसानं टळलं, असंही ते म्हणाले.

दुर्घटना झाल्यानंतर केरळला आवश्यक ती सर्व मदत पुरवल्याची माहिती केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी राज्यसभेत दिली.

<><><><><>

यंदाच्या अर्थसंकल्पात  आर्थिक वाढ, रोजगार, कल्याण, भांडवली गुंतवणूक, आणि वित्तीय बळकटीकरण यासारख्या प्राधान्याच्या बाबींमध्ये समतोल साधला असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. राज्यसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला त्यांनी आज उत्तर दिलं. सबका साथ, सबका विकास, सबका प्रयास या ब्रीद वाक्यावर सरकारचा विश्वास असून अर्थसंकल्पामुळे सहकारी संघराज्यवादाला प्रोत्साहन मिळाल्याचं त्यांनी म्हटलं. अर्थसंकल्पात कृषि क्षेत्रासाठी असलेल्या निधीत कपात केल्याचा विरोधकांनी केलेला आरोप त्यांनी

फेटाळला. शिक्षण, रोजगार आणि कौशल्य यासाठी १ लाख ४८ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

आयुर्विमा आणि आरोग्य विमा योजनेवरचा जीएसटी रद्द करण्याची विनंती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना पत्र लिहून केली आहे. नागपूरच्या आयुर्विमा महामंडळ कर्मचारी संघटनेकडून मिळालेल्या निवेदनानंतर त्यांनी हे पत्र लिहिलं आहे. जीवन विमा आणि वैद्यकीय विम्यावर १८ टक्के जीएसटी दर लागू होतो. जीवन विम्याच्या प्रीमियमवर जीएसटी लादणं म्हणजे जीवनाच्या अनिश्चिततेवर कर लादण्यासारखं असल्याचं त्यांनी पत्रात म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यातल्या साखर कारखान्यांना आर्थिक मदत देण्यासाठी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सहकार विकास महामंडळानं १ हजार ९०० कोटी रुपये मंजूर केले आहे. राज्यातल्या १३ सहकारी साखर कारखान्यांना त्याला लाभ होणार आहे. त्यातले सुमारे सोळाशे कोटी महामंडळानं आज राज्य सरकारला हस्तांतरित केले.

<><><><><>

बुलेट रेल्वे प्रकल्पाचं काम वेगानं पुढे जात असल्याची ग्वाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत दिली. या प्रकल्पाचा एक भाग म्हणून देशात पहिल्यांदाच समुद्राच्या खाली ३० मीटरवर २१ किलोमीटरचा बोगदा बांधला जात असल्याची माहिती प्रश्नोत्तराच्या तासाला पुरवणी प्रश्नांना उत्तरादाखल वैष्णव यांनी दिली. मेट्रो प्रकल्पासाठीचं ३२० किलोमीटर पायाबांधणीचं काम पूर्ण झालं असून मेट्रो हा तंत्रज्ञानाभिमुख प्रकल्प असल्याचंही ते म्हणाले.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज लोकसभेच्या कामकाजाला सुरुवात होताच जातनिहाय जनगणना करण्याच्या मागणीवरून विरोधकांनी गदारोळ केल्यानं लोकसभेचं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं होतं. कामकाजाला पुन्हा सुरुवात होताच प्रश्नोत्तरांचा तास पुकारण्यात आला.

**<><><><>**

केंद्र सरकारनं आज लोकसभेत भारतीय वायुयान विधेयक सादर केलं. नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरपु राममोहन नायडू यांनी हे विधेयक मांडलं. १९३४ च्या विमान कायद्यात नंतर अनेक दुरुस्त्या झाल्या, त्या तुकड्या-तुकड्यानं या विधेयकात समाविष्ट केल्यानं त्यात सुसूत्रता राहिली नाही, म्हणून त्यातला गोंधळ दूर करण्यासाठी भारतीय वायुयान विधेयक आणलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

कोणत्याही विमानाचं किंवा विमानश्रेणीचं डिझाईन, निर्मिती, देखभाल, ताबा, वापर, परिचालन, विक्री, आयात किंवा निर्यात यांच्या नियंत्रणासाठी नियम तयार करण्याचे अधिकार या विधेयकामुळे सरकारला मिळतील. विमान अपघात किंवा तत्सम घटनेच्या तपासाकरता नियम ठरवण्याचे अधिकारही सरकारला मिळतील, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

भारतीय प्रशासकीय सेवेतल्या वादग्रस्त परिविक्षाधीन अधिकारी पूजा खेडकर यांची नियुक्ती केंद्रीय लोकसेवा आयोगाने रद्द केली आहे. तसंच पुन्हा कोणतीही प्रशासकीय सेवा परीक्षा देण्यावर कायमची बंदी घातली आहे. परिविक्षाधीन कालावधीत अवाजवी मागण्या केल्याचा, तसंच दिव्यांगत्वाचं खोटं प्रमाणपत्र सादर करुन आरक्षणाचा लाभ उकळल्याचा, तसंच नागरी प्रशासकीय सेवा परीक्षेच्या नियमांचं उल्लंघन केल्याचा आरोप खेडकर यांच्यावर आहे. या संदर्भात आयोगाने बजावलेल्या नोटिशीला उत्तर देण्यासाठी खेडकर यांना आज दुपारी साडेतीन पर्यंत

मुदत देण्यात आली होती. मात्र त्या निर्धारित वेळेत उत्तर देऊ शकल्या नाहीत. तेव्हा केंद्रीय लोकसेवा आयोगाने हा निर्णय दिला. गेल्या १५ वर्षातल्या सुमारे १५ हजार उमेदवारांविषयीच्या नोंदी तपासून हा निर्णय दिल्याचं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

दरम्यान पूजा खेडकर यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला असून दिल्लीच्या न्यायालयात त्यावर उद्या सुनावणी होणार आहे.

<><><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी माजी केंद्रीय आरोग्य सचिव प्रीती सुदन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८३मधल्या तुकडीतल्या अधिकारी आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सुदन यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली. उद्यापासून प्रीती सुदन पदभार स्वीकारतील.

<><><><><>

राज्याचे नवे राज्यपाल म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांनी आज शपथ घेतली. मुंबईत राजभवनात आयोजित समारंभात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजीत पवार यांनी राज्यपाल राधाकृष्णन यांचं स्वागत केलं. राज्याच्या विकासासाठी आणि वंचितांच्या उद्धारासाठी राज्य सरकारला सर्व सहकार्य करू असं शपथविधीनंतर वार्ताहरांशी बोलताना राज्यपाल म्हणाले.

<><><><><>

महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी आज राजस्थानच्या राज्यपालपदाची शपथ घेतली. मुख्य न्यायाधीश न्यायमुर्ती  मणिंद्र मोहन श्रीवास्तव यांनी बागडे यांना राजभवन इथं राज्यपालपदाची शपथ दिली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिलेलं नियुक्तीच्या आदेशाचं पत्र मुख्य सचिव सुधांश पंत यांनी वाचून दाखवलं.

राज्यपालपदाची शपथ घेतल्यानंतर हरिभाऊ बागडे यांना मानवंदना देण्यात आली. यावेळी राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा, विधानसभेचे अध्यक्ष वासुदेव देवनानी, उपमुख्यमंत्री दिया कुमारी आणि प्रेमचंद बैरवा उपस्थित होते.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भारतीय खेळाडूंनी आगेकूच सुरु ठेवली. दोन वेळची ऑलिम्पिक पदकविजेती बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिनं पॅरिस महिला एकेरीत पुढच्या फेरीत प्रवेश केला. तिनं एस्टोनियाच्या क्रिस्टीन कूबा हिच्यावर २१-५, २१-१० अशी सहज मात केली. तर पुरुष एकेरीत लक्ष्य सेनने इंडोनेशियाचा जोनातन क्रिस्टी याचा २१-१८, २१-१२ असा पराभव केला.

पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात स्वप्निल कुसळे यानं सातवं स्थान मिळवत पुढच्या फेरीत धडक मारली, तर ऐश्वर्य प्रताप सिंह तोमर अकराव्या स्थानावर राहिल्याने स्पर्धेतलं त्याचं आव्हान संपुष्टात आलं. मुष्टियोद्धा लोव्हलीना बोर्गोहाइन हिनं नॉर्वेच्या प्रतिस्पर्ध्यावर मात करून उपांत्यपूर्व फेरी गाठली.

टेबल टेनिसमध्ये श्रीजा अकुला हिनं झेंग जियान हिचा पराभव केला. आता तिचा पुढचा सामना अग्रमानांकित चीनच्या सुन यिंगशा हिच्याशी होणार आहे. तिरंदाजीत दीपिका कुमारी हिनंही पुढच्या फेरीतलं स्थान निश्चित केलं आहे. या स्पर्धेत भारतानं आत्तापर्यंत दोन कास्यपदकं पटकावली आहेत आणि ही दोन्ही पदकं नेमबाजीतली आहेत.